लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,
धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई–४०० ००२
दूरध्वनी क्र. ०२२–२२०८८७००/२२०८८७००
Email: scc–mumbai@bhc.gov.in

दरपत्रक सुचना

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या मुख्य शाखा येथील न्यायालयीन इमारतींच्या आवारातील दोन पाण्याचे मीटर नादुरुस्त झाल्यामुळे त्याऐवजी दोन नवीन पाण्याचे मीटर ४० एम.एम. श्रेणी – (ब) बसविणे आवश्यक आहे.

तरी परवानाधारक ठेकेदारांनी आपली कागदपत्रे मोहोरबंद लखोटयात, त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात "दोन नवीन पाण्याचे मीटर ४० एम. एम श्रेणी (ब) दरपत्रक" असे लिहून ते "प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई – ४००२ ००२" यांच्याकडे दिनांक ०५ जानेवारी, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सदर सविस्तर दरपत्रक सुचनांची माहिती शासनाच्या http://www.bombayhighcourt.nic.in व http://sccmumbai.dcourts.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत.

Shahis 24/12/25

(निलम शाहीर)
प्रबंधक

लघुवाद न्यायालय, मुंबई)
)
दिनांक :२४ डिसेंबर, २०२५)

लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई – ४०० ००२.

जाहीर सुचना

या न्यायालयाच्या मुख्य शाखा येथील न्यायालयीन इमारतींच्या आवारातील दोन पाण्याचे मीटर नादुरुस्त झाल्यामुळे त्याऐवजी दोन नवीन पाण्याचे मीटर ४० एम.एम. श्रेणी (ब) बसविणेसाठी

जाहीर दरपत्रकाची प्रक्रिया अंमलात आणावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

१.	दरपत्रकधारक/संस्था हे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील परवानाप्राप्त असणे आवश्यक आहे तसेच सदर दरपत्रकधारकाचे नाव बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अधिकृत संकेतस्थळावर असणे आवश्यक आहे.
२.	दरपत्रकधारकाने/संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त झालेल्या नोंदणीकृत परवान्याची साक्षांकित प्रत दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
३.	दरपत्रकधारकाने/संस्थेने वैध जी.एस.टी. क्रमांक व प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती देखील दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकीटावर ठळक अक्षरात नमूद करावे.
४.	दरपत्रकधारकाने/संस्थेने यापूर्वी ज्या ठिकाणी नवीन मीटर बसविले असतील, त्याचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरित केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.
५.	दरपत्रकाधारकाने/संस्थेने दरपत्रक हे मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"दोन नवीन पाण्याचे मीटर ४० एम.एम श्रेणी (ब) दरपत्रक"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई – ४०० ००२"** यांच्याकडे दिनांक ०५ जानेवारी, २०२६ पर्यत दुपारी २.०० वाजेपर्यत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात.
६.	दरपत्रक हे संबंधीत समितीच्या निर्णयानुसार नमुद दिवशी या न्यायालयाच्या संबंधीत समितीसमोर उघडण्यात येतील. त्यावेळेस दरपत्रकाधारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे. त्यावेळेस हजर नसलेल्या दरपत्रकाधारकांची कुठल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. **दरपत्रक उघडण्याची तारीख दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.**
७.	दोन नवीन पाण्याचे मीटर **४० एम.एम. श्रेणी (ब)** बसविणेकामी येणा-या खर्चाची रक्कम G.S.T. सहीत तपशीलवार दरपत्रकांमध्ये दाखल करावयाची आहे.
८.	मा. मुख्य न्यायाधीश साहेब यांना जाहीर दरपत्रक प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहीत.
९.	निश्चित केलेल्या दरपत्रकाधारकाने/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर आणि सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदरचे देयक अधिदान व लेखा

	कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम धनादेशाद्वारे/एन.ई.एफ.टी.द्वारे अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेष किंवा बँकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान व अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकित प्रत देणे अनिवार्य आहे.
१०.	दरपत्रक उघडण्याच्या दिवशी संबंधीत दरपत्रकधारकाने/संस्थेने जी कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर केली आहेत त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती समितीसमोर दाखवणे बंधनकारक राहील.
११.	दरपत्रक उघडल्यानंतर आवश्यकतेनुसार कागदपत्रे जोडली नसतील तर अशा अपात्र दरपत्रकधारकांना/संस्थेना पुढील प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
१२.	दोन नवीन पाण्याचे मीटर ४० एम.एम. श्रेणी (ब) बसविणेकामी आवश्यक खर्च जसे वाहतूक व इतर गोष्टीची जबाबदारी संबंधीत संस्थेची असेल.
१३.	दरपत्रकामध्ये उल्लेखित काम हे वर्क ऑर्डर मिळाल्यापासून १५ दिवसात पूर्ण करणे आवश्यक आहे.

NBShahir 24/12/25

(निलम शाहीर)
प्रबंधक

लघुवाद न्यायालय, मुंबई)
)
दिनांक :२४ डिसेंबर, २०२५)